INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

# भारतीय महिलांच्या आर्थिक व सामाजिक समस्या: एक समाजशास्त्रीय विवेचन

प्रा. कामराज आर. रामटेके
डॉ. अरुण मोटार महाविद्यालय, कोंढा कोसरा
ता.पवनी जिल्हा. भंडारा
Email- kamraj749@gmail.com
मो. नं 7517586015, 9637607896

**सारांश:-**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर विशेषता मध्ययुगीन समाजात महिलांवर जे अन्याय अत्याचार बंधने होती ती दूर करण्यात आली. देश स्वतंत्र झाल्यावर भारताने लोकशाही शासन प्रणालीचा स्वीकार केला. आणि भारतीय राज्यघटनेत स्वातंत्र्य समता बंधुता न्याय या मानवी मूल्यांचा भारतीय संविधानात समावेश करण्यात आला. भारतीय राज्यघटनेनुसार सर्व प्रकारच्या विषमता नष्ट करण्यात आल्या, लिंग असमानतेमुळे महिलावर लादली असलेले सर्व प्रकारची निर्बंध हटविण्यात येऊन महिलांना समान अधिकार देण्यात आले. एवढेच नव्हे तर लिंग विषमता पाळणे कायद्याने गुन्हा ठरविण्यात आले. भारतीय समाजात स्त्रीला पतीची अर्धांगिनी म्हटले आहे. स्त्रियांना आदिशक्ती, जगत जननी, माता लक्ष्मी, गृहलक्ष्मी, गृहदेवता, देवी अशा विविध संबोधनाने संबोधिल्या जाते. वैदिक कालखंडापासून ते 19 व्या शतकाच्या कालखंडापर्यंत महिलांना अनेक संकटांना सामोरे जावं लागलं. याच कालखंडात अनेक रूढी परंपरांनी स्त्रियांना काळीज हेलावून टाकणारे दुःख दिल्याचे दिसून येते. मात्र एवढे असूनही याही काळात कर्तुत्ववान स्त्रियांचे उल्लेख आढळतात. इसवी सनाच्या आठव्या-नवव्या शतकापर्यंत कर्तुत्ववान कर्तबगार आणि विदुषी महिलांचे स्वतंत्र उल्लेख पहावयास मिळतात.

स्त्रीची विवाह आणि पुत्र जन्माने योग्यता तपासल्या जात होती. डॉ. मंगला आठवलेकर यांच्या लेखणीतून महापुरुषांच्या नजरेतून स्त्री या पुस्तकात विचार व्यक्त करतात. की स्त्री पुरुष असा फरक करत स्त्रीचा जेवढा वापर करणं शक्य झालं आहे. तेवढा करत आणि पायातील वाहन पायीच बरी असे म्हणत साऱ्यांनी स्त्रीला तुडवता येईल तितकं तुडवलं.

भारतीय समाजात स्त्रियांवर अनेक प्रकारची बंधने लागण्यात आली होती. जैवशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिलं तर जगातील सर्व माणसे समान सारखे आहेत. प्रत्येकाच्या मूलभूत गरजा सारखे आहेत. मात्र असे असूनही इथली माणसे धर्म, लिंग, वय, वंश आणि श्रीमंती या आधारावर इथे समाजा समाजामध्ये विभिन्नता आढळते. यामध्ये शूद्र, पशु, ढोर, गवार और नारी ये सब ताडन के अधिकारी या उक्तीप्रमाणे स्त्रियांच्या वाट्याला फार हलाखीचे दिवस आल्याचे दिसते. महिलांना हुंडाबळी, देवदासी जीवनसाथीची निवड घरगुती हिंसा बाल अपराचिता जातीभेद, लिंग, विषमता वृद्ध महिला अशा कित्येक समस्यांना सामोरे जाऊन जीवन जगावे लागते. शारीरिक, मानसिक, शैक्षणिक, आर्थिक समस्या स्त्रियांपुढे आ वासून उभ्या आहेत, माझ्यासमोर कोणती समस्या नाही असे सांगणारा मनुष्यप्राणी दुर्मिळ असू शकेल, महिलांची आर्थिक सामाजिक आणि शैक्षणिक स्थिती सुधारली तर वैश्विक बदल घडतो. महिलांचे योग्य सामाजीकरण केले, तर स्त्री ही जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाला उधारी असे होऊ शकते. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे शाळेच्या रूपाने लावलेले ज्योतिराव फुले

आणि सावित्रीबाई फुले यांचे रोपटे जागतिक स्तरावर गाजते. त्यांनी भेदभावाच्या नावाखाली होणाऱ्या अज्ञानाला विज्ञानाचा पर्याय दिला. त्यांनी दाखवून दिले की जेव्हा एक स्त्री शिकते तेव्हा, ती केवळ एक कुटुंबच नाही तर अख्या समाज आणि इतिहास बदलण्याची ताकद ठेवते. भारतीय राज्यघटनेने महिलांना आर्थिक व सामाजिक क्षेत्रात पुरुषांनी इतकेच समान अधिकार दिले आहेत. स्त्री आणि पुरुषांचा दर्जा समान आहे. मात्र असे असले तरी सुद्धा अजूनही भारतात महिलांचा आर्थिक आणि सामाजिक विकास सन्मान दर्शक नाही.

**बीज संज्ञा ;-** महिलांचे प्रश्न, आर्थिक महत्त्व, सामाजिक विकास, समाज व्यवस्था, समानता

**प्रस्तावना:-**

कोण आहे स्त्री? प्रत्येकांना समजून घेणारी, सतत घरात काम करणारी घर नावाच्या भवनात चार भिंतीच्या आत घरातील सर्वांचे चेहऱ्यावर हसू फुलविण्यासाठी राब राब राबणारी घरातील माणसांच्या खांद्याला खांदा लावून सदा उभी असणारी, आपल्यासाठी झटत असणारी आणि अमापगोष्टी उदरात घालण्यापासून ते आश्चर्य वाटावे इतक्या चांगल्या प्रकारचे नेतृत्व करियेपर्यंत स्त्रीच असते. पण तिच्या मानसिक, आर्थिक, सामाजिक प्रश्नांचे काय? हा प्रश्न गंभीर आहे. संयुक्त कुटुंब पद्धतीमध्ये सासू-सासरे, दिरभासरे, ननंद, नातेवाईक, वडील मंडळी यांच्यापासून होणारी घुमसट आणि या सर्वांसाठी जीव तोडून काम करताना, मात्र होणारा भावनिक छळ स्वतःच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्या विषयी करावी लागणारी, तडजोड व या सबंध गोष्टीना तोंड देत वर्षाचे 365 दिवस आपल्या कामात मग्न असणारी स्त्री.

स्त्रियांना आपल्या मनातील भावना व्यक्त करता येत नाही. कित्येकदा ती व्यक्त करताना कोणाकडे व्यक्त करावे नव्हे ती व्यक्त करण्यासाठीची सामाजिक परिस्थिती त्या प्रकारची नाही. घरामध्ये लहान मुले असताना जर घरातील सदस्य त्रास देत असतील, तर दुःख सांगावे कुणाकडे अशावेळी फक्त हतबल होऊन मनात दुःख गिळून राहण्यापलीकडे दुसरा कोणताच पर्याय नाही. यामुळे महिलांना सामाजिक, आर्थिक आणि मानसिक परिणाम भोगावे लागतात. महिलांनी आपल्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. कित्येक वर्ष त्रास सहन करूनही त्रास थांबत नसेल तर, महिलांनी खंबीर भूमिका घेणे आवश्यक आहे. आपल्या सामाजिक, आर्थिक व मानसिक स्वास्थ्याच्या समोर येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला, घटनेला, गोष्टीला सीमा आखून द्या. स्वतःच्या विकासासाठी स्वतःला प्रश्न विचारा स्वतःशी संवाद साधा. आणि मी सक्षम आणि खंबीर आहे हे स्वतःला बजावून सांगा. स्वतःसाठी वेळ काढा स्वतःच्या आवडीनिवडी जपा इतरांचा विचार करताना मी पण माणूस आहे. मला पण मन आहे या गोष्टींचा सर्वांगीण विचार करून आपला विकास साधावा.

**उद्देश:-**

1. महिलांची आर्थिक क्षेत्रात असलेल्या प्रभावाची जाणीव होणे.
2. महिलांचा आर्थिक क्षेत्रात सहभाग वाढणे.
3. आर्थिक उन्नती प्राप्त झाली तर महिलांसाठी जीवनाच्या सर्व क्षेत्रात प्रगती वाढविकास आणि सन्मान प्राप्त व्हावा.
4. महिलांची सामाजिक कार्यामधील सहभाग वाढावा.
5. महिलांना केवळ स्त्री म्हणून पाहू नये, तर एक माणूस म्हणून समाजात पाहण्याचा दृष्टिकोन वृद्धिंगत व्हावा.

6. महिलांना जीवनाच्या सर्व क्षेत्रात निर्भयतेने जगता यावे, यासंबंधीच्या दृष्टिकोन वाढविणे.
7. महिलांना पूर्वी असलेला मानसन्मान आदर मिळावा.
8. महिलांचे आर्थिक व समाज योगदान नव्या पिढीला कळविणे.
9. महिलांच्या आर्थिक, सामाजिक या समस्यांबरोबर इतरही समस्या सर्व स्तरातील लोकापर्यंत पोहोचविणे.

**संशोधनाची गृहीत कृत्य**

1. भारतीय समाजात महिलांचे प्रश्न
2. महिला समाजातील आधारस्तंभ

**संशोधन पद्धती:-**

सदरहू शोधनिबंधात वर्णनात्मक सामाजिक संशोधन पद्धतीचा वापर केलेला आहे. संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा आधार घेतलेला आहे. वैचारिक लेख, शासकीय दस्तऐवज, संदर्भ ग्रंथ, दैनिक वृत्तपत्रांचा आधार घेऊन संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे. भारतीय समाजात मातृदेवो भव| पितृ देवो भव| अशी आई-वडिलांना श्रद्धास्थानी मानण्याची फार मोठी समृद्ध अशी सामाजिक मान्यता आहे. यामध्ये मातृदेवो भव या ओळीचे विश्लेषण केले तर, असे निदर्शनास येते की मातृ म्हणजे माता आई आणि माता आई म्हणजे स्त्री, महिला व या महिलेलाच समाजामध्ये जीवन जगताना, अनेक सामाजिक व आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागते. अनंत मरणे शोषून घ्यावी इथल्या जगण्यासाठी.

भारतीय समाजात महिलांना शिक्षणाचा अधिकारच नाकारला होता. त्या बालपणात पित्याच्या, तरुणपणात पतीच्या आणि वृद्धापकाळात मुलांच्या छत्रछायेखाली राहावे. अशा प्रकारची सामाजिक व्यवस्था निर्माण करण्यात आली होती. त्यामुळे सहाजिकच त्यांच्या आर्थिक स्वावलंबनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. परंपरागत कायद्यांच्या कचाट्यात सापडलेली स्त्री संविधानाच्या समतेच्या आधारावर विकासाची समान संधी मिळाल्याबरोबर शिक्षणातच नव्हे तर, अर्थार्जण सेवा योजनातील संधीमुळे तसेच नोकरीमुळे मिळालेल्या स्वावलंबनामुळे सक्षम होऊन, सशक्तिकरणाची वाट चालू लागल्याचे दिसून येते. आर्थिक धोरण राबविण्याबाबत 39 व्या कलमानुसार उपजीविकेचे पर्याप्त साधन मिळविण्याचा अधिकार स्त्री-पुरुषांना समान राहील.

**महिलांच्या आर्थिक समस्या:-**

भारतातील श्रम विभाजन हे जाती आधारावरच नाही, तर ते लिंग आधारित व्यवस्थेवर सुद्धा आहे. ढोर पशु, शूद्र, गवार और नारी ये सब ताडन के अधिकारी म्हणजे महिलांना आपण त्यांच्या मर्जीने नाही, तर पुरुषांच्या मर्जीने वागवू असे म्हटल्यास वावगे होणार नाही. महिलांना घरामधील चूल आणि मूल अशा प्रकारचे काम देण्यात आले होते. त्यामुळे आर्थिक विकासामध्ये महिला मागे राहिल्याचे दिसते. महिला आर्थिक व्यवस्थेमध्ये मागे असल्यामुळे त्यांच्या दैनंदिन कार्यात अडचण जाऊ नये, म्हणून बचत गटाची संकल्पना पुढे आली. महिलांच्या खूप मोठ्या प्रमाणात नाही, तर जेमतेम आर्थिक अडचणी बचत गटाद्वारे पूर्ण होतात. आर्थिक विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने अनुकूल परिस्थिती निर्माण करता आली नाही. आर्थिक विकासाच्या अभावामुळे महिलांना इतर सर्व समस्या जसे घराची समस्या, शिक्षणाची समस्या, व्यवसायाची समस्या, आरोग्याची समस्या विवाहाची समस्या, हुंडाबळीची समस्या, फसवणुकीची समस्या, नवबधवला जाळून मारण्याची समस्या अशा

कित्येक समस्या त्यांच्यापुढे आहेत. आज आधुनिक काळात स्त्रिया सर्व क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने खांद्याला खांदा लावून काम करताना दिसतात. पण आर्थिक विकासाची बरोबरी पूर्णता आलेली दिसून येत नाही. आर्थिक गरजा पूर्ण करताना महिलांची फार मोठी पिळवणूक होते. स्त्रियांना अनेक पातळयांवर आर्थिक समस्येची तडजोड करावी लागते. स्त्रियांना आर्थिक दृष्ट्या आत्मनिर्भर बनविणे करिता ठोस उपाय दिसत नाही. संपत्ती मौल्यवान वस्तू यापासून त्यांना दूर ठेवले जाते. बरेचदा पुरुष मंडळी कडून स्त्रियांना त्यांच्या खर्चासाठी पैसे दिले जात नाही. नोकरी करणाऱ्या महिलेवर नोकरी सोडण्यासाठी दबाव आणल्या जातो. नोकरीच्या ठिकाणी महिलांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. मजुरी करणाऱ्या महिलांची वेतन मजुरी योग्य स्वरूपात दिल्या जात नाही. गडचिरोली जिल्ह्यामध्ये आदिवासी महिलांना गावकोर सारख्या पद्धतीमुळे त्रास सहन करावा लागतो. विवाह होण्यापूर्वी उद्धटपणा परपुरुषांची बोलणे, घरी उशिरा येणे यासारख्या कारणांसाठी चाल, रीत, वळण चांगली नसल्याच्या कारणामुळे वडिलांच्या कुटुंबात त्रास सहन करावा लागतो. पतीकडील घरामध्ये स्वयंपाक बिघडणे, अन्य पुरुषांशी संबंध असल्याचा संशय, पैसे किंवा इस्टेटमध्ये वाटा देण्यास नकार यासारख्या कारणामुळे स्त्रियांना अनेक आर्थिक समस्यांना सामोरे जावं लागतं.

**महिलांच्या सामाजिक समस्या:-**

समाजशास्त्राच्या अभ्यासकांनी भारतातील अनेक समाजाचा अभ्यास करून, त्या त्या समाजातील महिलांच्या सामाजिक प्रश्नांचा समस्यांचा समाजशास्त्रीय दृष्टीने महिला या आधारावर समस्या आढळून आल्या. समाजातील महिला म्हणून अनेक प्रकारच्या समस्या, असमानता दिसून येतात महिलांचा शहरी, ग्रामीण आदिवासी समुदायाचा विचार केला, तर शहरी भागातील काही प्रमाणात महिलांची सामाजिक स्थिती चांगली वाटते, मात्र ग्रामीण व आदिवासी महिलांचा विचार केला, तर त्यांच्यापुढे अनेक समस्या आहेत. भारतात विकासाची व आधुनिकीकरणाची प्रक्रिया सुरू आहे. संविधानाने देशाचा नागरिक म्हणून सर्वांना समान अधिकार दिले. मात्र स्त्री महिला या आधारावर स्त्रियांना अनेक सामाजिक समस्यांना सामोरे जावं लागतं. परंपरागत ग्रामीण आणि आदिवासी समाजात शैक्षणिक दृष्टिकोनातून महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन जीवनाच्या सर्व बाजूने अजूनही प्रगल्भ झालेला नाही. महिलांना अन्न आणि वस्त्र पुरविले की, आपली जबाबदारी संपली असा जो दृष्टिकोन आहे त्यामध्ये प्रगल्भता येणे गरजेचे आहे. महिला सुद्धा मानव आहेत, मनुष्य आहेत त्यांना भावभावना आहेत. त्यांना जीवन जगत असताना स्वतंत्र अस्तित्व आहे. ही भावना जागृत झाली तर महिलांच्या सर्व क्षेत्रातील विविध समस्यांचे निराकरण होईल.

महिलांना मोठे होत असताना शिक्षण, खेळ, चित्रपट, नाटक, दंडार, गायन, नृत्यकला, वाद्य वाजविणे, संगीत धावणे, पोहणे, समाज प्रबोधन, वैद्यकीय व्यवसाय सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी मध्ये सहभागी होण्याचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत महिलांचे प्रमाण कमी आहे. घरामध्ये शिजवलेले रात्रीचे शिळे अन्न पुरुषांऐवजी महिलांनाच खावे लागते. किंवा ते त्यांचेच कर्तव्य आहे असे समजले जाते. बालिका मृत्यू व गर्भजल परीक्षण हे महिलांना लिंगावर आधारित असलेली फार मोठी समस्या आहे. ग्रामीण आदिवासी समुदायांमध्येच नव्हे तर, डॉक्टर, इंजिनियर, वकील, प्राध्यापक मोठे पांढरपेशी लोक सुद्धा महिलांना म्हणजे स्वतःच्या पत्नीला त्रास दिल्याचे अनेक बातम्या वृत्तपत्रात वाचावयास मिळतात.

**मूल्यमापन:-**

आधुनिकीकरणाच्या कालखंडात नव्हे, तर कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात महिलांना जीवनाच्या आर्थिक व सामाजिक क्षेत्रात अनेक समस्यांना तोंड द्यावे लागणे, म्हणजे समाज विकासात पोकळी निर्माण होणे आहे. केवळ भौतिक विकास म्हणजे विकास नाही. जगात महिला वाजतील तर देश वाचेल. महिला सशक्त तर देश सशक्त. महिला वाचून कुटुंब, परिवार, समाज, गाव, राजे, देश, जग याची कल्पना होऊ शकत नाही. महिलांचे सर्वांगीण विकास साधण्यासाठी सर्वांच्या सहकार्याची आपलेपणाची साथ मिळाली, तर कोणत्या समस्या उद्भवणार नाही.

संदर्भ:-

1. भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, डॉ. प्रदीप आगलावे, साईनाथ प्रकाशन नागपूर, आवृत्ती जुलै 2009.
2. भारतातील सद्यकालीन सामाजिक समस्या, प्रा. रा. ज. लोटे, पिंपळापुरे अँड कं पब्लिसर्स नागपूर, पहिली आवृत्ती नोव्हेंबर 2018.
3. महापुरुषांच्या नजरेतून स्त्री, डॉ. मंगला आठवलेकर,
4. कादंबरीकार राजन गवस, डॉ. अनिल बोपचे,विजय प्रकाशन नागपूर प्रथम आवृत्ती 2017.
5. सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, डॉ. प्रदीप आगलावे, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर पाचवी आवृत्ती जानेवारी 2015.
6. सामाजिक चळवळी : परंपरागत आणि आधुनिक,डॉ. शैलजा देवगांवकर, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर.
7. दैनिक पुण्यनगरी, दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ पेज न.४